# मुंबई विद्यापीठ

क्र.का.प्रा.वि./ आयसीडी/२०२३-२४/३७७

व्यवस्थापन परिषद

## मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सन २०२३-२४ मधील दिनांक १८ सप्टेंबर, २०२३ च्या बैठकीचे इतिवृत्त

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सभा मंगळवार, दिनांक १८ सप्टेंबर, २०२३ रोजी सायंकाळी ४:०० वाजता ऑनलाईन माध्यमाने आयोजित करण्यात आली होती.

बैठकीमध्ये खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते :-

| अनु. क्र. | माननीय सदस्यांचे नाव | पदनाम | उपस्थिती/ अनुपस्थिती |
|---|---|---|---|
| १ | प्रा. रविंद्र कुलकर्णी ( कुलगुरु) | अध्यक्ष | उपस्थित |
| २ | प्रा. अजय भामरे (प्र-कुलगुरू) | सदस्य | उपस्थित |
| ३ | डॉ. शेषाद्री चारी | सदस्य | उपस्थित |
| ४ | डॉ. अनिल कुमार सिंग (प्रभारी अधिष्ठाता) | सदस्य | उपस्थित |
| ५ | डॉ. कविता लघाटे (प्रभारी अधिष्ठाता) | सदस्य | उपस्थित |
| ६ | प्रा. शिवराम गर्जे | सदस्य | उपस्थित |
| ७ | श्री.संदीप सिंग | सदस्य | उपस्थित |
| ८ | सचिव, उच्च व शिक्षण विभाग | सदस्य | अनुपस्थित |
| ९ | संचालक, उच्च शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| १० | संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| ११ | प्रा. सुनिल भिरूड ( प्रभारी कुलसचिव) | सदस्यसचिव | उपस्थित |
| १२ | श्री. अशोक फळणीकर (वित्त व लेखा अधिकारी) (प्रभारी) | निमंत्रित | उपस्थित |
| १३ | डॉ. प्रसाद कारंडे (प्रभारी संचालक, प.व.मु.मं.) | निमंत्रित | उपस्थित |

**स्वागत** : सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करून मा.अध्यक्ष यांना सभेचे कामकाज सुरु करण्यास अनुमती प्रदान करण्याबाबत विंनती केली व मा. अध्यक्षांनी विनंती मान्य करून सभेची कार्यवाही सुरु करण्यास अनुमती दिली.

**अभिनंदन : सभा सुरू होण्यापुर्वी श्री. अशोक फळणीकर वित व लेखा आधिकारी (प्रभारी) यांची नियुक्ती करण्यात आल्याने व्यवस्थापन परिषदेतर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले.**

**श्रद्धांजली :**

## सत्येंद्र कुमार खोसला उर्फ बिरबल

हिंदी चित्रपटसृष्टीत बिरबल या नावाने ओळखले गेलेले ज्येष्ठ विनोदी अभिनेते सत्येंद्र कुमार खोसला यांचे दिनांक १२ सप्टेंबर, २०२३ रोजी वृध्दपकाळाने निधन झाले. मृत्यू समयी ते ८४ वर्षांचे होते.

## माणिक भिडे

ज्येष्ठ शास्त्रीय संगीत गायिका माणिक भिडे यांचे वृध्दापकाळाने दिनांक १३ सप्टेंबर, २०२३ रोजी निधन झाले. मृत्यू समयी त्या ८८ वर्षांच्या होत्या.

## आर.एस.पप्पू

भारतातील ज्येष्ठ पर्यावरण पुरातत्व शास्त्रज्ञ डॉ. आर.एस.पप्पू यांचे दिनांक १५ सप्टेंबर, २०२३ रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. मृत्यु समयी ते ८९ वर्षांचे होते.

माननीय सर्व सदस्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली वाहिली.

| बाब क्र. | व्यवस्थापन परिषदेची बाब | विभाग |
|---|---|---|
| १ | दिनांक १२ सप्टेंबर, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ठराव | दिनांक १२ सप्टेंबर, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त मंजूर करण्यात आले. | |
| २ | मुंबई विद्यापीठातील कुलसचिव व वित्त लेखा अधिकारी हि रिक्त झालेली संविधानिक पदे भरण्याबाबत. | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | विद्यापीठात रिक्त असलेली १. कुलसचिव व २. वित्त व लेखा अधिकारी पदांची जाहिरात मराठी व इंग्रजी वृत्तपत्रात तसेच विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याकरिता व्यवस्थापन परिषदेत मान्यता देण्यात आली.<br>तसेच उपरोक्त पदे भरण्याकरिता विहित तरतुदीनुसार निवड समितीवर, व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला एक निर्वाचित सदस्य यांचे नामनिर्देशन करण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना देण्यात आले. | |

| | | |
|---|---|---|
| ३ | The matter regarding lien of the one year Dr. Sunita Magre, Professor, Department of Education, University of Mumbai. | शैक्षणिक नेमणुक व गुणवत्ता हमी |
| ठराव | महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक नियुक्ती-२०१०/(प्र.क्र.३३७/२०१०/)मशि/५, दिनांक २३ ऑगस्ट, २०१० च्या निर्णयान्वये अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी २ वर्षाचा धारणाधिकार मंजूर करणेसंबंधी तरतुद आहे. त्यानुसार डॉ. सुनिता मगरे, प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ यांना सेंट्रल युनिव्हर्सिटी, झारखंड येथे प्राध्यापक हया पदासाठी 1 वर्षाचा धरणाधिकार (Lien) खालील अटींच्या अधिन राहून देण्यात येत आहे.<br>१) The Head, Department of Education, University of Mumbai हयांचे ना हरकत प्रमाणपत्र (No Objection Certificate) सादर करावे.<br>२) The Director, Knowledge Resource Centre हयांचे ना हरकत प्रमाणपत्र (No Objection Certificate) सादर करावे.<br>३) The Finance & Account Section हयांचे ना हरकत प्रमाणपत्र (No Objection Certificate) सादर करावे.<br>४) The University Engineer हयांचे ना हरकत प्रमाणपत्र (No Objection Certificate) सादर करावे.<br>५) General Administration Department हयांचे ना हरकत प्रमाणपत्र (No Objection Certificate) सादर करावे.<br>६) The Secretary, University of Mumbai, Employee's Co-op Credit Society Ltd. हयांचे ना हरकत प्रमाणपत्र (No Objection Certificate) सादर करावे.<br>७) दर महिन्याला डॉ.सुनिता मगरे यांची मासिक देयके / कपात (उदा. डी.सी.पी.एस./जी.पी.एफ.,पी.एफ, किंवा अन्य कपात) विद्यापीठात जमा करण्याची जबाबदारी व तपासून घेण्याची जबाबदारी डॉ.सुनिता मगरे हयांची असेल.<br>८) मुंबई विद्यापीठास काही विशिष्ट कामानिमित्त (नॅक इत्यादी वेळेस) त्यांच्या उपस्थितीची गरज भासल्यास त्यांनी विद्यापीठात उपस्थित राहणे बंधनकारक असेल. | |

| | | |
|---|---|---|
| ४ | The matter regarding lien of two year to Dr.Sarika Mahajan, Assistant Professor, JBIMS, University of Mumbai (Unaided/ Self Financed) | शैक्षणिक नेमणुक व गुणवत्ता हमी |
| ठराव | महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक नियुक्ती-२०१०/(प्र.क्र.३३७/२०१०/) मशि/५, दिनांक २३ ऑगस्ट, २०१० च्या निर्णयान्वये अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी २ वर्षाचा धारणाधिकार मंजूर करणेसंबंधी तरतुद आहे. त्यानुसार डॉ. सारिका महाजन, सहायक प्राध्यापक, जमनालाल बजाज इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेन्ट स्टडीज, मुंबई विद्यापीठ यांना रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया येथे Programme Co-ordinator at College of Supervisors ह्या पदासाठी 2 वर्षाचा धारणाधिकार (Lien) खालील अटींच्या अधिन राहून देण्यात येत आहे.<br>१) The Director, Jamnalal Bajaj Institute of Management ह्यांचे ना हरकत प्रमाणपत्र (No Objection Certificate) सादर करावे.<br>२) The Director, Knowledge Resource Centre ह्यांचे ना हरकत प्रमाणपत्र (No Objection Certificate) सादर करावे.<br>३) The Finance & Account Section ह्यांचे ना हरकत प्रमाणपत्र (No Objection Certificate) सादर करावे.<br>४) The University Engineer ह्यांचे ना हरकत प्रमाणपत्र (No Objection Certificate) सादर करावे.<br>५) General Administration Department ह्यांचे ना हरकत प्रमाणपत्र (No Objection Certificate) सादर करावे.<br>६) The Secretary, University of Mumbai, Employee's Co-op Credit Society Ltd. ह्यांचे ना हरकत प्रमाणपत्र (No Objection Certificate) सादर करावे.<br>७) दर महिन्याला डॉ. सारिका महाजन यांची मासिक देयके / कपात (उदा. डी.सी.पी.एस./जी.पी.एफ.,पी.एफ, किंवा अन्य कपात) विद्यापीठात जमा करण्याची जबाबदारी व तपासून घेण्याची जबाबदारी डॉ. सारिका महाजन ह्यांची असेल.<br>८) मुंबई विद्यापीठास काही विशिष्ट कामानिमित्त (नॅक इत्यादी वेळेस) त्यांच्या उपस्थितीची गरज भासल्यास त्यांनी विद्यापीठात उपस्थित राहणे बंधनकारक असेल. | |

| | | |
|---|---|---|
| ५ | Application for resignation Dr. Sanjay Ranade. | शैक्षणिक नेमणुक व गुणवत्ता हमी |
| ठराव | व्यवस्थापन परिषदेने डॉ. संजय रानडे, समन्वयक, जनसंज्ञापन व पत्रकारिता विभाग, मुंबई विद्यापीठ यांचा राजीनाम खालील अटींच्या अधिन राहून मंजुर करण्यात येत आहे.<br>१) The Head, Department of Communication & Journalism ह्यांचे ना हरकत प्रमाणपत्र (No Objection Certificate) सादर करावे.<br>२) The Director, Knowledge Resource Centre ह्यांचे ना हरकत प्रमाणपत्र (No Objection Certificate) सादर करावे.<br>३) The Finance & Account Section ह्यांचे ना हरकत प्रमाणपत्र (No Objection Certificate) सादर करावे.<br>४) The University Engineer ह्यांचे ना हरकत प्रमाणपत्र (No Objection Certificate) सादर करावे.<br>५) General Administration Department ह्यांचे ना हरकत प्रमाणपत्र (No Objection Certificate) सादर करावे.<br>६) The Secretary, University of Mumbai, Employee's Co-op Credit Society Ltd. ह्यांचे ना हरकत प्रमाणपत्र (No Objection Certificate) सादर करावे. | |
| ६ | Appointment of Assistant Professor on purely temporary / contract basis of various University Departments / Institutions/ Colleges for the academic year 2023-24. | शैक्षणिक नेमणुक व गुणवत्ता हमी |
| ठराव | मुंबई विद्यापीठातील विविध विभाग/संस्था/ महाविद्यालयातील आवश्यकतेनुसार हंगामी सहायक प्राध्यापक भरती करण्यास मान्यता देण्यात आली व जाहिरातीचा मसुदा मान्य करण्यात आला. | |
| ७<br>स्था | मुंबई विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार येथील संचालक आणि विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा, मानव्य विद्याशाखा व आंतर-विद्याशाखीय अभ्यास या विद्याशाखेकरिता अधिष्ठाता ही अनुदानित पदे भरणेबाबत. | शैक्षणिक नेमणुक व गुणवत्ता हमी |

| | | |
|---|---|---|
| ठराव | मुंबई विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार येथील संचालक आणि विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा, मानव्य विद्याशाखा व आंतर-विद्याशाखीय अभ्यास या विद्याशाखेकरिता अधिष्ठाता ही अनुदानित पदे भरणेबाबतमंजुरी देण्यात आली. | |
| ८ | विद्यापीठाच्या वेगवेगळ्या विभागाच्या तांत्रिक तसेच प्रशासकीय मदतीसाठी विशेष कार्य अधिकारी (OSD) नेमणे बाबत. | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | प्रशाकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे, कौशल्यसक्षम मनुष्य बळाची गरज, व प्रशासकीय कामाचा ताण लक्षात घेता परीक्षा विभागात ४ तज्ञ व्यक्तीची विशेष कार्य अधिकारी/ सल्लागार **(OSD/ ADVISOR)** व माहिती व संदेशवहन तंत्रज्ञान विभागात ३ विशेष कार्य अधिकारी/सल्लागार **(OSD/ ADVISOR)** नेमण्यास मान्यता देण्यात आली. तसेच विशेष कार्य अधिकारी/ सल्लागार यांची अहर्ता, अनुभव व मानधन ठरविण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना देण्यात आले. | |

कुलसचिवांनी अध्यक्षांचे आभार मानून त्यांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

कुलसचिव (प्र)

प्र- कुलगुरू

मा. कुलगुरू

28 NOV 2023

① R & DR-CA to sign on each page.

② Submit ATR within 7 days

VC

28 NOV 2023